मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करते की,

माझे नाव : दिपाली विवेक वाघ,

वय : 43 वर्षे, धंदा : घरकाम,

रा. मयुर पार्क रोड, हरसुल, छ. संभाजीनगर

**द्वितीय पक्षकाराचा सरतपास : श्री. एन. एल. ढोबळे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :**

1. शपथेवर कथन करते की, माझे साक्ष शपथपत्रातील मजकूर खरा आहे व तो माझे सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला आहे. I त्यावर मी वाचून सही केली आहे.

**द्वितीय पक्षाच्या साक्षीदाराचा उलटतपास : प्रथम पक्षातर्फे श्री. एस. व्ही. डंख वकील यांच्यातर्फे अधिकारीत वकील श्री. आर. आर. पिटेकर वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :**

2. या प्रकरणातील मयत द्वितीय पक्षकार विवेक तुळशीराम वाघ हे माझे पती होते. सदरील साक्षी पुरावा त्यांची वारसदार पत्नी म्हणून मी नोंदवीत आहे.

3. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कालावधीत माझे पतीने काम केले तो कालावधी मी माझे शपथपत्रामध्ये नमूद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीला कंपनीने प्रत्येक नियुक्ती वेळेस नियुक्ती पत्र दिले होते व कामावरून कमी करताना कमी केल्याचे पत्र दिले होते. माझे पतीला दिलेले नियुक्ती पत्र व कमी केल्याचे आदेश मी दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीला कामावरुन कमी केल्याच्या आदेशात त्यांच्या नियुक्ती पत्राचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीला कामावरून कमी करण्यात आलेल्या आदेशात असे नमूद केले आहे की, त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे त्यांना कामावरून कमी करण्यात आले आहे.

4. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीला कामावरुन कमी केल्यानंतर दुसरा आदेश मिळेपर्यंत त्यांनी बजाज कंपनीत काम केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, बजाज ॲटो मध्ये माझे पतीने केव्हाही सलग 240 दिवस काम केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नियुक्ती पत्र घेताना माझे पतीवर कोणताही दबाव नव्हता. हे म्हणणे

खरे आहे की, त्यांनी प्रत्येक कामावरून कमी केल्याच्या आदेशास या प्रकरणा व्यतिरिक्त इतरत्र कोठेही आव्हानीत केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती कामावर असताना त्यांना कायम करावे म्हणून कोठेही प्रकरण दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात माझे पती पक्षकार नव्हते.

5. माझे पतीच्या जागेवर कोणत्या कनिष्ठ कामगारांना कंपनीने नेमणूक दिली त्यांची नावे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी इतर कोणत्याही कर्मचा–याचे कागदपत्रे पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ज्या वेळेस माझे पतीला कंपनीत काम मिळाले त्या त्या वेळेस त्यांना नियमीत कामगारासारखा पगार मिळाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतींची नेमणूक तात्पुरत्या कामासाठी व तात्पुरत्या स्वरूपाची होती. साक्षीदार परत सांगतात की, मी कायमस्वरूपी काम करत होतो.

6. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीला शेवटचे कामावरून 1999 मध्ये कमी करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, बजाज कंपनीने माझे पतीस पुनर्नेणूकीचे लेखी आश्वासन दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, माझे पतीला दिलेले नियुक्तीपत्र बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीने खोटे मागणीपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.01.28 10:54:13 +0530

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क. 1 औरंगाबाद

दिनांक–27/01/2026